'IO'

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर    **P.S.(ठाणे):** वर्तक नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0369    **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/09/2022 00:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार    **Date From (दिनांक पासून):** 22/09/2022
**Time Period (कालावधी):** पहर 4    **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/09/2022
**Time From (वेळेपासून):** 12:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/09/2022    **Time (वेळ):** 16:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/09/2022 00:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रभाग समिती,वर्तक नगर,मालमत्ता कर विभाग, लोकमान्य प्,प्रभाग समिती कार्यालय ठाणे वर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. रामचंद्र बिराप्पा बेगी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 401,गणेश निवास चौथा मजला,लोकमान्य नगर पाडा नं 1, ठाणे ,वर्तक नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 401,गणेश निवास चौथा मजला,लोकमान्य नगर पाडा नं 1, ठाणे ,वर्तक नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9833733736

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रविण गजेंद्रनाथ सरतापे | | | 1. 177/6187,भाजी मार्केट, न्यू भिमनगर सोसा,बी विंग, चौथा मजला कन्नमवार न1,विक्रोली मुंबई,,वर्तक नगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रु दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्तकनगर पो स्टे गु र नं ll 369/2022 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (सशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे८

मी श्री. रामचंद्र बिराप्पा बेगी वय 39 रा. रूम नं. 401,गणेश निवास चौथा मजला, लोकमान्य नगर पाडा नं. 1, ठाणे प. मोबाईल नंबर- 9833733736 समक्ष हजर राहून फिर्याद देतो की,

मी वरील प्रमाणे असून वरील नमुद पत्त्यावर माझे कुंटुबासोबत राहत असून रबाले, एमआयडीसी येथील स्कॅश कोर्पोरेशन लि. या कंपनीमध्ये इंजिनियर म्हणून कामकाज पाहतो. सदर कंपनीमध्ये मी मागील 2 वर्षापासून काम करीत आहे.

मी लोकमान्यनगर पाडा नं. 01, येथील गणेश निवास या इमारतीचे चौथा मजल्यावर मार्च 2022 मध्ये फ्लॅट विकत घेतला आहे. सदर फ्लॅट 670 स्वेअर फिट हा अनाधिकृत असल्याने नोटरी करून खरेदी केला आहे. सदर फ्लॅट चे मालमत्ता कर माझे नावावर करणेकामी मी दिनांक 22/07/2022 रोजी वार्ड नं. 77, वेदांत प्रभाग समिती वर्तकनगर येथे मिळकतीचे हस्तांतरण नमुना फॉर्म भरुन अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज भरणेकामी आमच्या इमारतीचे खालच्या मजल्यावर राहणारा माझा मित्र कुणाल बर्वे यांनी मदत केली असुन तो लोकमान्य-सावरकनगर प्रभाग समिती मध्ये पाणी पुरवठा विभागात कामास आहे. सदर कामा बाबत मी त्याना सांगितले असता त्यानी मला कर वसुली विभागात जावुन तेथील अधिकारी यंाना भेटण्यास सांगुन मदत लागल्यास करेन असे सांगितले. त्याप्रमाणे मी खरेदी केलेल्या वरील प्रॉपर्टीचे मालमत्ता करा बाबत संबधीत अधीकारी श्री. प्रविण सरतापे यांना भेटलो असता श्री. प्रविण सरतापे यांनी प्रॉपर्टी टॅक्सची शासकीय फि 3000/रुपये रक्कम खाली खिडकीवर भरावी लागेल तसेच अर्जावर सही देण्याकरीता स्वतःकरीता 5,000/रुपये दयावे लागतील असे सांगून माझेकडे 5000/रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली आहे. मी जर त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम दिली नाही तर ते माझे मालमत्ता कर हस्तांतरणाचे काम करणार नाही. तरी मला श्री. प्रविण सरतापे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द कारवाई होणेसाठी अँन्टी करप्षन ब्युरो ठाणे येथे मी दिनांक 21/09/2022 रोजी माझे स्वःहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली होती.

मी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 21/09/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यायात दोन पंच साक्षीदारा समक्ष कायदेशीर बाबींचा अवलंब करून मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच साक्षीदार नं. 1 यांचेसह लोकसेवक श्री. सरतापे यांना भेटण्याकरीता पाठविण्यात आले. मला दिलेल्या निर्देशाप्रमाणे मी, पंच साक्षीदार नं. 1 यांच्या समवेत ठाणे महानगरपालिका लोकमान्य-सावरकरनगर प्रभाग समिती, सहा. आयुक्त कार्यालय, वेदांत कॉम्पलेक्स, कोरसरोड, वर्तकनगर, ठाणे येथे माझी TVS अॅक्सेस मोटार सायकल क्र. MH-04.EM.6063 लोकसेवक श्री. सरतापे यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी लोकसेवक श्री. सरतापे यांनी, ''तुम्हांला टॅक्स नावावर करायच आहे तर तुम्हांला बोललो होतो. तुम्ही आर्ध्या तासामध्ये येतो असे सांगुन गेलात. त्यावर मी त्यंाना पैश्याचा बंदोबसत झाला नाही असे सांगितले. थोड अमाउंट कमी करा असे सांगितले असता लोकसेवक सरतापे यानी नाय... नाय सॉरी काहीच करू शकत नाही, असे सांगितले. त्यावर मी त्याना पावतीचे तिन हजार भरतो व तुम्हाला पाच हजार दयावे लागतील असे सांगितले असता लोकसेवक सरतापे यानी मी काहीच करू शकत नाही. तेव्हा मी सरतापे याना चार पण नाही होणार साहेब चार हजार ? असे विचारले असता लोकसेवक श्री. सरतापे यांनी 'नाही होवू शकत, मी काहीच करू शकत नाही, नियमाप्रमाणे सहया राहतात.'' असे सांगून माझेकडे

5000/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी मी उदया पैशाची व्यवस्था करून उदया येतो असे सांगून निघुन आलो. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
लोकसेवक श्री. सरतापे यांनी माझेकडे 5000/-रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याची संमती दर्शविल्याने पोउपअधी श्रीमती राजेकुंभार यांनी पुढील सापळा कारवाई उदया सकाळी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मी आज दिनांक 22/09/2022 रोजी सकाळी 10.05 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर झालो. सदरवेळी सापळा कारवाईकरीता माझे अंगझडतील 500 रूपये दराच्या 10 चलनी नोटा असे एकुण 5000/- रूपये माझे बचतीतील रक्कम पोउपअधी श्रीमती राजेकुंभार यांचेकडे मी हजर केली. त्यानंतर कायदेशीर बाबींचा अवलंब करून लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझ्या शर्टाच्या समोरील डाव्या बाजूचे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोउपअधी श्रीमती राजेकुंभार यांचे सुचने वरून सापळा कारवाई करीता लोकसेवक श्री. सरतापे यांच्या कार्यालयात गेलो. सदरवेळी माझेसोबत सर्व पथक व दोन्ही पंचदेखिल उपस्थित होते.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. प्रविण सरतापे यांचे टेबला समोरील खुर्चीत जावुन बसलो. त्यावेळी त्यांनी लोकसेवक श्री. सरतापे यांचेशी ''साहेब ते काल बोलणं झालं ते पैशाचं..पैसे घेवुन आलो मी बघा ना काय कमी होतील तर साहेब'' असे सांगितले असता लोकसेवक सरतापे यांनी नाही काय करता येणार. काहीच करता येणार नाही, पेपर सगळे जमा केले का तुम्ही'' त्यावर मी तुमच्याकडे जमा केल्याचे सांगुन काय पावती भेटणार नाही का असे विचारले असता लोकसेवक सरतापे यांनी नाय.... नाय असे सांगितले. त्यावर मी तुमचे पाच हजार पण आणलेले प्लस, फि' चे तिन हजार पण आणलेत असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक सरतापे यांनी स्वतःचे मोबाईलवरून कुणाल बर्वे यास फोन करून बोलावुन घेतले. कुणाल बर्वे आल्यावर सरतापे यांनी मला कुणाल यास श्री. तायडे साहेबांचे कॅबीन मध्ये जाण्यास सांगितले. त्यांनतर कुणाल यास सरतापे यांनी आवाज दिल्याने कुणाल हे परत सरतापे यांचेकडे गेला तर ते एकटेच कक्षात आत गेले. त्यानंतर लोकसेवक सरतापे व कुणाल असे श्री. तायडे साहेबांचे कॅबीन मध्ये आले. त्यावेळी सरतापे यांनी तु ते आणले का असे सांगुन सरतापे यानी हातवारे करून माझेकडे पैशाची विचारणा करून सरतापे हे बाहेर निघुन गेले. त्यावेळी कुणाल याने मला, ते पैसे मागतात का? अशी विचारणा केली. त्यानंतर सरतापे हे पुन्हा कॅबीन मध्ये आले त्यांनी तु म्हणतोय काय तरी कमी करा तु त्यांची पावती मिळते का? अपण पाणी वाल्यानकडुन सात-आठ हजार घेतो त्यांची पावती देतो का? पावती ती फाडणार आहे तीन हजाराची ती तुम्हाला.... ती तुम्हाला वरिष्ठांची सहीची ती पावती मिळेल. मला सहयासाठी मला दयावे लागतात पैसे असे सांगुन सरतापे यांनी स्वतःचे हाताची बोटे एकमेकांवर घासुन त्यांचेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली त्यावेळी मी माझे शर्टाचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवलेली लाचेच्या रक्कमेची घडी माझे डावे हाताने काढुन लोकसेवक सरतापे यांचे पुढयात धरली असता लोकसेवक सरतापे यांनी सदरची रक्कम कुणाल बर्वे यांना घेण्यास सांगितले असता कुणाल याने नाही... तुम्हीच घ्या असे सांगितले असता लोकसेवक सरतापे यांनी त्यांचे डावे हाताने लाचेची रक्कम स्विकारून लाचेची रक्कम त्यांचे पॅन्टचे समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवुन दिली. लोकसेवक श्री. प्रविण सरतापे यंानी कुणाल बर्वे यांचे समक्ष माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली आहे. त्यावेळी मी पाच हजार आहेत साहेब असे सांगुन साहेब करून घ्या असे म्हणुन कॅबीनचे बाहेर येत असताना लोकसेवक यानी लाचेची रक्कम स्विकाले बाबत माझे उजवे खांदयावरील सॅग बॅग उजवे हातात खाली धरून ठरल्याप्रमाणे पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक श्री. प्रविण सरतापे यांना 12ः20 वाजता पंचासमक्ष रंगेहाथ पकडले आहे. सदरवेळी पोउपअधी श्रीमती राजेकुंभार यांनी लोकसेवक श्री. सरतापे यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्री. प्रविण गजेंद्रनाथ सरतापे, वय. 46 वर्षे, व्यवसाय- लिपिक, मालमत्ता कर विभाग, लोकमान्य प्रभाग समिती, वर्तक नगर, प्रभाग समिती कार्यालय ठाणे महानगरपालिका ठाणे. रा. 177/6187 बी विंग, चौथा मजला, कन्नमवार नगर नं. 1, भाजी मार्केट, न्यू भिमनगर सोसायटी, विक्रोली मुंबई असे सांगितले. सदरबाबत सविस्तर सापळा पुर्व व सापळा कारवाई पंचनामा वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात आलेला आहे.
तरी श्री. प्रविण गजेंद्रनाथ सरतापे, वय. 46 वर्षे, व्यवसाय- लिपिक, मालमत्ता कर विभाग, लोकमान्य प्रभाग समिती,वर्तक नगर, प्रभाग समिती कार्यालय ठाणे (वर्ग- 3) रा. 177/6187 बी विंग, चौथा मजला, कन्नमवार नगर नं. 1, भाजी मार्केट, न्यू भिमनगर सोसायटी, विक्रोली मुंबई, यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन माझे मालमत्ता कर हस्तातरीत करून देण्यासाठी दिनांक 21/09/2022 रोजी पडताळणी कारवाईचेवेळी माझेकडे 5000/- रूपये लाचेची मागणी करून दिनांक 22/09/2022 रोजी सापळा कारवाईचेवेळी 5000/- लाचेची रक्कम स्विकारून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला. म्हणून माझी त्यांच्या विरुध्द फिर्याद आहे. लोकसेवक यांना देण्याकरीता वापरण्यात आलेली लाचेची रक्कम ही मी माझे वैयक्तीक बचतीमधून दिलेली आहे.

माझी फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखित करण्यात आली असून ती मी वाचुन पाहीली ती मी माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद लिहून दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SADASHIV VISHNU NIKAM (I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** SADASHIV VISHNU N

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**